अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे -५
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/९७३६
दिनांक : २१/०३/२०२०

## - आदेश -

विषय:- कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पुणे महानगरपालिका कार्यालयांतील अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करणेबाबत.

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. समय-२०२०/प्र.क्र.३५/१८ (र.व.का.) दि. १८/०३/२०२०
२) आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/९७११ दि.१९/०३/२०२०
३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. समय-२०२०/प्र.क्र.३५/१८ (र.व.का.) दि. २०/०३/२०२०

विषयाचे अनुषंगाने संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयातील मे. राज्य शासनाचे निदेश विचारात घेऊन पुणे महानगरपालिका कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांची संख्या ५० टक्के राहील, याबाबत संदर्भ क्र. २ अन्वये आदेश प्रसृत करण्यात आले आहेत.

२. तथापि, असे जरी असले तरी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या माध्यमातून कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अधिक तातडीची उपाययोजना म्हणून शासनाने संदर्भ क्र. ३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.

अ) मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नागपूर शहर येथील सर्व शासकिय, निमशासकीय आणि महानगरपालिका कार्यालयातील अधिकारी / कर्मचा-यांची दैनंदिन उपस्थिती २५ टक्के ठेवण्यात यावी यासाठी मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील सचिव / महापालिका आयुक्त / संबंधित विभागप्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी याबाबत तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी.

ब) तथापि परिच्छेद २-अ येथे नमूद केलेल्या क्षेत्रामधील शासकिय, निमशासकीय आणि महानगरपालिका कार्यालयांमधील, नागरिकांना अत्यावश्यक सेवा देणा-या सर्व अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य राहील.

या संदर्भातील उक्त परिच्छेद क्र. २ अ येथे नमूद केलेल्या क्षेत्रातील कार्यालयांसंदर्भात उर्वरित सूचना दिनांक १८ मार्च २०२० च्या शासन निर्णयानुसार कायम राहतील. तसेच सदरहू क्षेत्रातील कार्यालये वगळता अन्य कार्यालयांना दिनांक १८ मार्च २०२० च्या शासन निर्णयातील सर्व तरतुदी लागू राहतील.